# गडांचा वेध 'गिरीवेध'च्या माध्यमातून!



**प्रतिनिधी :** गड ही देशाची राष्ट्रीय संपत्ती असून त्याचे जतन करणे नागरिकांच्याच हातात असल्याचा संदेश देणारे 'गिरीवेध' प्रदर्शन प्रभादेवीच्या रवींद्र नाट्यमंदिर येथे सुरू आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रसिद्ध छायाचित्रकार गोपाळ बोधे यांनी सुमारे ६० किल्ल्यांचे हवाई चित्रण केले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन नौदलाच्या पश्चिम विभागाचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल संग्रामसिंग बैस यांनी नुकतेच केले.

हे प्रदर्शन पाहताना बैस म्हणाले की, गड हे आपल्या गतकाळाचे वैभव असल्याची साक्ष हे प्रदर्शन बघताना होते. त्यामुळे या गतकाळाच्या वैभवाच्या संवर्धनाची जबाबदारी आपल्यावरच आहे. त्यासाठी प्रदर्शनाच्या माध्यमातून लोकापर्यंत पोहोचता येईल, अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. या प्रदर्शनामध्ये जलदुर्ग, पाण्याला लागून असलेले किल्ले, भूदुर्ग, डोंगरी किल्ले अशा विविध प्रकारच्या किल्ल्यांच्या समावेश करण्यात आला आहे. फक्त महाराष्ट्रच नव्हे तर गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि केरळ येथील गडांचाही समावेश यामध्ये आहे. विश्वास बसणार नाही, पण मुंबई शहरातील सुस्थितीत असलेले सात किल्लेही येथे पाहायला मिळतील. या सर्व गडांचे हवाई चित्रण फोटो गोपाळ बोधे यांचे असून त्यासह या किल्ल्यांचे ट्रेकर्स आणि इतर छायाचित्रकारांनी काढलेले फोटोही येथे पाहायला मिळतील. ट्रेकिंगसाठी प्रसिद्ध असलेल्या 'चक्रम' या संस्थेतर्फे आणि सिद्धीशक्ती प्रकाशनातर्फे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून किल्ले जतन करण्याचा संदेश यामधून दिला जात आहे.

याबाबत बोलताना या प्रकल्पाचे प्रमुख महेश कदम म्हणाले की, ट्रेकिंगसाठी, गड पाहण्यासाठी अनेक जण जातात. पण त्यांचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने विचार होत नाही. महाराष्ट्रातल्या अनेक गडांची आज वाताहत होत आहे. जुन्या वास्तू पडत आहेत, दगड गायब होतात. हे सगळं थांबण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता हवी. हे गड ऐतिहासिक वारसा सांगतात. लढायांची, बलिदानाची कथा सांगतात. त्यामुळे ट्रेकिंगचा वैयक्तिक आनंद घेताना सामाजिक भान बाळगून या गडांचे संरक्षण केले पाहिजे, असे कदम यांनी सांगितले. ८ फेब्रुवारापर्यंत हे प्रदर्शन सकाळी ११ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सुरू राहील. ■